# शबरी कुंभ व वनवासी विकास
## श्री. प्रकाश काळे

हरिद्वार, प्रयाग, उज्जैन आणि नाशिक या चार ठिकाणी कुंभमेळा भरतो हे सर्वश्रुत आहे. समाजाचे एकत्व आणि धार्मिक, अध्यात्मिक अधिष्ठान लाभलेले हे चार ठिकाणचे कुंभ भारतीय परंपरा, श्रद्धा आणि संस्कृतीचे प्रतीक आहे. असे कुंभमेळे सामाजिक आस्था, विश्वास, श्रद्धा यावर आधारित धर्म संरक्षणाचे आणि उत्थापनाचे कार्यक्रम असतात. परंपरेने आलेले हे 'कुंभ' आजच्या बदलत्या समाज रचनेशी सुसंगत असले तरी स्वाभिमानी, स्वावलंबी व शक्तिसंपन्न राष्ट्रनिर्माणासाठी 'शबरी कुंभा'ची संकल्पना मूर्त स्वरूपात आणून राष्ट्रार्पण करण्याचा मानस आहे. म्हणजेच या पुढे पाच कुंभमेळ्याची श्रद्धावान परंपरा सुरू होईल. हा प्रथम कुंभमेळा गुजरातमधील डांग जिल्ह्यात पंपासरोवराच्या पावन भूमित माग पौर्णिमेला (म्हणजे ११, १२, १३ फेब्रुवारी २००६) संपन्न होणार आहे.

स्वतंत्र भारतात स्वातंत्र्यानंतर समाजातील अराष्ट्रीय कार्यात रस घेणाऱ्या धार्मिक संघटनांनी, समाजातील अविकसित, दीन, निरक्षर जनजाती समुदायाचे 'सेवा' या नावाखाली मतांतरण करण्याचा चंग बांधला आणि मतांतरणातून राष्ट्रांतरणापर्यंत मजल मारली, याचे ढळढळीत उदाहरण डांग जिल्ह्यात पाहवयास मिळाले. या मतांतरणास रोखून धरण्यासाठी आणि भारतीय हिंदू जीवन पद्धतीस उत्कर्षाप्रत ठेवण्यासाठी, अराष्ट्रवादी कारवायांना प्रतिबंध करण्यासाठी 'शबरीकुंभ' हे उत्तर आहे. समाजात धर्माबद्दलचा विश्वास जागृत व्हावे व स्वतःबद्दलचा विश्वास अधिक दृढ व्हावा व त्यातून समाजास स्थैर्य निर्माण व्हावे. यामुळे स्वाभिमान जागृत होऊन विकासाचा मार्ग दिसतो. कुंभ निर्मात्यांनी स्वाभिमानी, बलसंपन्न व एकसंघ समाजाची निर्मिती आणि 'स्वावलंबनातून विकास' हा संदेश देण्याच्या संकल्पास शबरी कुंभाचे औचित्य साधले आहे.

शबरीकुंभ निर्मात्यांनी गेल्या १२ वर्षांत भिन्न भिन्न ठिकाणी असलेल्या वनवासी बांधवांच्या विकासासाठी केलेल्या आणि यशवंत झालेल्या प्रयोगांची माहिती समाजास देण्याचे ठरविले आहे.

श्रद्धाजागरण, शेती, पाणी, जंगल, वनौषधी, स्वयं सहाय्यता गट, पशु (गाय) संवर्धन, पर्यावरण अशा व्यावहारिक जीवनाशी निगडीत आयामाचे विकासातून वनवासी समर्थ, संपन्न होतील.

मुले अपंग होऊ नयेत म्हणून देशभर पोलियो अभियान चालविले जाते. मतांतरणाने देश / समाज अपंग करणाऱ्या विरुद्ध कोणते अभियान आहे? स्वातंत्र्य प्राप्तीनंतर वनवासी विकासासाठी ठोस प्रयत्न शासनाकडून झाले नाहीत. वनवासींची उपेक्षा झाली. मतांतरणाच्या विळख्यात सापडून त्यांना स्वतःची ओळख राहिली नाही. त्यांच्या संस्कृतीचा ऱ्हास त्यांचा सर्वनाश आहे म्हणून वनवासींचा स्वाभिमान जागवून समाज दुभंग न होऊ देता विकासाचा मार्ग समर्थतेचा, बलशाली व्यक्तिमत्त्वाचा पथ स्वीकारून वनवासींच्या अंधश्रद्धेला डोळस वैज्ञानिक श्रद्धेत्व रूपांतरीत करून त्यांचा सर्वांगिण विकास हे शबरीकुंभाचे तीर्थजल आहे. वनवासी समाजास दुभंग करून भारतीय संस्कृती, परंपरा या पासून तोडून, नव्या संस्कृतीशी, नव्या विचार धारणेशी सेवेच्या नावाखाली दावणीला बांधले जाते त्यावेळी तो हिंदूंचा रहात नाही आणि अन्यांचा होत नाही. अशा विपन्न अवस्थेत विकासाचे मार्ग अनिश्चित असतात. म्हणून 'आत्मदिपोभव' या भावनेने 'स्व' जागरण करणे म्हणजे श्रद्धाजागरण. स्वतःवर श्रद्धा व स्वतःचा आत्मविश्वास यातून अपूर्व विकास, अर्थपूर्ण विकास, शक्तिसंपन्न विकास, स्वजातीय विकासाचे प्रकाश किरण चैतन्यमयी असतात.

वनवासींच्या विकासाच्या जल, जंगल, शेती, पशुसंवर्धन, ग्रामविकास, स्वयंसहाय्यता (बचत) गट, पर्यावरण रक्षण या महत्त्वाच्या गोष्टी आहेत. या गोष्टींचा विकास म्हणजे समर्थ वनवासी समर्थ भारत. वनवासी जनजीवन निसर्गाशी निगडित आहे. निसर्गावर अपार श्रद्धा आणि प्रेम आहे. झाड तोडायचे झाल्यास तो झाडाची पूजा करतो. नवीन झाड लावतो. निसर्ग त्याचा अन्नदाता आहे. राखी पौर्णिमेला झाडांना राखी बांधली जाते. शेती हा मुख्य व्यवसाय. डोंगर कपारीतील शेती, मर्यादित क्षेत्र, पावसावर अवलंबून, पारंपारिक पद्धती आणि नवनवीन तंत्रज्ञानापासून वंचित असणाऱ्या वनवासी बंधूंसाठी वनवासी कल्याण आश्रमाने शेती विषयावर अधिक लक्ष केंद्रित केले. शेती मर्यादित म्हणून उत्पन्न कमी - म्हणजे रोजी रोटीचा प्रश्न. म्हणून विकसित प्रयोगातून शेतीचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न केले. पाणी हा शेतीचा आत्मा म्हणून पाण्यासाठी साठवण बंधारे, कूपनलिका, विहीरी, शेत-तळी, लिफ्ट योजना यांच्या सुविधा उपलब्ध करून देताना वनवासींचे सहकार्य घेण्यात येते. शेती ही मुख्यत्वे भात शेती आहे. यासाठी जनसेवा फाऊंडेशन पुण्याचे डॉ. दप्तरदार यांनी चतुःसुत्री भात लागवड पद्धती विकसित करून प्रात्यक्षिके दाखवून प्रत्यक्ष काम करून मर्यादित शेतीतून येणारे पूर्वापार उत्पन्न दुप्पट / अडीचपट येते हे

सिद्ध करून दाखविल्याने वनवासींचे स्थैर्य निश्चित झाले. वनौषधींची शेती हा नवा अविष्कार मूर्त स्वरूप घेतो आहे ज्यात औषधी गुण नाहीत अशी कोणतीही वनस्पती नाही. झाड पाल्याची औषधे म्हणून त्यांचा उपहास करण्याचे दिवस संपले. आयुर्वेदिक उपचार जगन्मान्य होत आहेत. या झाडपाल्यांची औषधे वनवासींकडून जाणून घेऊन समान आरोग्य संपन्न होत आहे. वनौषधी लागवडीतून आर्थिक लाभ होत आहे. डिंक, मध, मेण यासारख्या जीवनोपयोगी वस्तू जंगलातून मिळू शकतात. म्हणून जंगल संरक्षण महत्त्वाचे. पावसाचे प्रमाण कमी होऊ नये, जमिनीची उपजाऊ क्रयशक्ति कमी होऊ नये आणि प्रदूषणाला आळा बसावा यासाठी जंगल संरक्षण महत्त्वाचे. सध्या बायोडिझेल निर्मितीचे प्रकल्प उभे केले असून बायो डिझेलचे उत्पादन सुरू केले आहे. भूगर्भातून इंधन तेल काढून प्रदूषण वाढविण्यापेक्षा करंजीच्या बीयापासून डिझेल निर्मिती, बायोखत निर्मिती हा वनवासी विकासाचा शिरोबिंदू आहे. करंजीची झाडे उन्हाळ्यातही हिरवीगार राहतात. त्यांना किटकनाशके, औषध फवारणीची गरज नसते. अशा झाडांच्या लागवडीतून वनवासींना रोजगार उपलब्ध करून दिला जात असल्याने विकासाचे नवे व अल्प खर्चाचे साधन उपलब्ध केले आहे. जंगल संरक्षणाून ग्राम विकास, आर्थिक उन्नयन आणि स्वावलंबी ग्रामवासींचा प्रयोग धुळे जिल्ह्यातील बारीपाडा येथील चैत्राम पवारने अविरत परिश्रमातून केला व आंतरराष्ट्रीय ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंटचा पुरस्कार मिळविला. शेतीमधील ज्वारी, मका यांच्या उत्पन्न वाढीसाठी संशोधन सुरू आहे.

पावसाच्या वाहून जाणाऱ्या पाण्याचे प्रबंधन करून, साठवण बंधारे बांधून नैसर्गिक खाचणात पाणी साठवून शेतीचा विकास करणाऱ्या नगर जिल्ह्यातील ढगेवाडीचा प्रकल्प हा वनवासी जिद्दीचा, मेहनतीचा, संघभावनेचा उत्कृष्ट नमुना आहे. एकेकाळी पाड्यावरील सर्वजण दारिद्र्य रेषे खालील कार्ड धारक होते. टामाटोच्या उत्पादनातून सहकारी तत्त्वावर 'अंबिका' ज्यूसचा कारखाना उभा करून उत्पादन विक्री सुरू आहे. दारिद्र्य रेषेखालील कार्डे सर्व गावकऱ्यांनी परत केली हे कदाचित पहिले उदाहरण असेल. संधी मिळाली की त्याचे सोने करायचे हा वनवासी स्वभाव आहे. गावात स्वाभिमान जागृती विकासातून येते. दया उपेक्षिणारा क्रांति करू शकत नाही. म्हणून वनवासींची उणीव स्वाभिमान जागृतीतून, आत्मविश्वास देऊन करायची. जोपर्यंत आत्मश्रद्धा, विश्वास जागृत होत नाही का मेजननी। को मे माता। याचे भान येत नाही तोपर्यंत आर्थिक उत्थापनासाठी प्रयत्नशील राहता येत नाही. हे भान देण्यासाठी शबरीकुंभाचे आयोजन आहे.

भारतीय संस्कृतीची पायाभूत धारणा अशी आहे की 'आपण तरेल ते नव्हेच नवल! कुळे उद्धारिल दुजांची जो।'' स्वतःच्या विकासाबरोबर इतरांचाही विकास हा धर्म ही प्रकृती समाज कट्टर धर्मनिष्ठ असल्याशिवाय वरील विचार कृतिशील होत नाही. या विचारातून स्वयं सहाय्यता बचत गटाची संकल्पना पाड्या पाड्यावर पोहोचविली. त्यातून आर्थिक लाभ व अडचणीवरचे उपाय आले. छोटे छोटे घरगुती व्यवसाय सुरू झाले. ??? ही कुटुंबाची आधारशिला असते. तीचा बचतगट तीला आणि कुटुंबाला नव्या प्रेरणा देऊन आर्थिक अडचणींवर मात करायला व परिवर्तनाला मदत करतो. या बचतगटातून स्व-पर विकास साधतो.

पशुसंवर्धन हा विकासाच महत्त्वाचा घटक, पशुसंवर्धनात 'गाय' महत्त्वाची. शेतीसाठी लागणारी शेणखते गाय संवर्धानातून येतात. गोमूत्र औषधी आहेच पण त्यापासून किटकनाशके, सामान्य (शहरी) जनजीवनास उपयोगी पडणारी औषधे, साबण तयार होत असून त्याचा बाजार तेजीत आहे. गांडूळशेती यालाच जोडून करता येते. हे जैविक खथ जमिनीची रासायनिक खताने क्षीण होणाऱ्या उपजाऊ शक्तिचे रक्षण करते. उपजाऊ शक्ती वाढविते. कमीत कमी खर्चात चांगली फळे, भाजीपाला पिकविता येतो. जल, जमिन स्वच्छ राखता येते. गोमूत्रापासून बनविलेल्या औषधाच्या नागपूर प्रकल्पास 'इंटरनॅशनल पेटंट' मिळाले आहे.

समाज जागृतीची ही अल्प कहाणी. शबरी कुंभाच्या माध्यमातून मतांतरणास प्रतिबंध करायचा आहे. कारण मतांतरण हिंसक असते, त्याने माणसामाणसात द्वेष निर्माण होतो. मतांतरण साम्राज्यवादाचे प्रतीक असते. देश लुटतो व बंधुभाव तुटतो. आम्ही सारे एकाच भारतमातेची लेकरे आहोत. वनवासी हिंदू आहेत म्हणूनच हिंदू वनसंस्कृती विकसित झाली आहे. अस्पृश्यता, मारक रूढी परंपरा बाजूस सारून धर्म संस्कृतीवर आधारित संघटित भारत समर्थ भारत पुन्हा एकदा विश्ववंद्य करून विघटनवादी अल्पसंख्यकांच्या राष्ट्रविरोधी कारवायांचे समूळ उच्चाटन करायचे आहे यासाठी

समाजाची स्वाभिमान जागृती

आणि स्वाभिमान जागृतीसाठी शबरी कुंभ

शबरीकुंभातून वनवासींचा सर्वांगिण विकास

अपेक्षित आहे.